# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.06.2025** **वार- मंगळवार**

---

**पिंपरी-चिंचवड**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे हरित कर्जरोखे सूचित करण्याचा कार्यक्रम आज मुंबईत पार पडला. अशापद्धतीने भांडवली बाजारातून निधी उभारणारी पिंपरी- चिंचवड ही देशातील पहिली महापालिका ठरल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी काढले. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते. पिंपरी - चिंचवड महापालिकेने जारी केलेल्या हरित कर्जरोख्यांना जनतेने चांगला प्रतिसाद दिला. गुंतवणूकदारांनी भरभरून गुंतवणूक केली. कर्ज रोखे जारी झाल्यानंतर काही मिनिटातच १०० कोटी रुपयांची गुंतवणूक याद्वारे करण्यात आली. त्यानंतर गुंतवणूकदारांमध्ये पाच पटीने वाढ झाली. यावरून गुंतवणूकदारांचा हरित कर्ज रोख्यांवरील विश्वास दिसतो. या रोख्यांचा कालावधी ५ वर्षांचा असून त्यासाठी ७ पूर्णांक ८५ शतांश टक्के स्पर्धात्मक व्याजदर निश्चित करण्यात आल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या निधीतून पायाभूत सोयी सुविधांची कामं केली जाणार असून ती कामंही पर्यावरण पूरक आणि शाश्वत विकासाची असतील असं मुख्यमत्र्यांनी सांगितलं.

**मेधाकुलकर्णी**

जागतिक तापमान वाढ आणि प्रदूषणाची समस्या वाढत असताना पर्यावरणाचा समतोल राखणाऱ्या सुवर्णपिंपळ, वड, आंबा, चिंच, बांबू यासारख्या देशी झाडांची लागवड मोठ्या प्रमाणात व्हायला हवी, असं प्रतिपादन खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी आज पुण्यात केलं. पद्मा प्रतिष्ठान आणि

ज्ञानमाऊली फाऊंडेशननं आयोजित केलेल्या 'जागर पर्यावरणाचा' या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. पर्यावरण संरक्षणात जागतिक पातळीवर योगदान देत असलेले विष्णू लांबा यांच्यासह विविध मान्यवरांना यावेळी सन्मानित करण्यात आलं. दरम्यान वटपौर्णिमेनिमित्त आज पुण्यात ठीकठिकणी महिला वर्गानं वडाची पूजा केली, तसंच अनेक संस्थांनी वटवृक्षाचं रोपण केलं.

**<u>राष्ट्रवादी</u>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २६ वा वर्धापन दिन आज पुण्यात साजरा होत आहे. यानिमित्त पक्षाचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केला. राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा देण्याची तयारी दाखवली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी नव्या चेहऱ्यांना संधी द्यावी अशी विनंती त्यांनी पुण्यात आयोजित पक्षाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात केली. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर लक्ष केंद्रीत करा, असं आवाहन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी यावेळी उपस्थितांना केलं.

**<u>ग्लोबलपुलोत्सव</u>**

पुलंच्या शब्द प्रवासाचा मी निःशब्द सहप्रवा सी आहे, अशी नम्र भावना ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांनी व्यक्त केली. पुलंच्या साहित्याला पूरक चित्रे मी रेखाटू शकलो हा मी माझा भाग्ययोग समजतो, असं ते म्हणाले. पुण्यात सुरू असलेल्या 'ग्लोबल पुलोत्सवा'मध्ये पु.ल. आणि त्यांच्या साहित्यास समर्पित व्यंगचित्रांच्या आणि चिंतामणी हसबनीस यांच्या ब्रेल चित्रांच्या प्रदर्शनाचं उद्घाटन शि. द. फडणीस यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**<u>PMPML</u>**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड अर्थात PMPML तर्फे आणखी एकोणीस मार्गांवर महिला विशेष बस सेवा सुरू करण्यात  येणार आहे. कात्रज, स्वारगेट, पुणे महापालिका भवन, भेकराईनगर हडपसर भोसरी या ठिकाणाहून ही बस सेवा असेल. महिलांच्या सुरक्षित प्रवासाला महामंडळ प्राधान्य देत असल्याचं महामंडळाच्या अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ मुंडे यांनी सांगितलं.

**<u>पुणेमनपा</u>**

झाडणकामाच्या १४७ कोटी रुपयांच्या निविदा पुणे महापालिका आयुक्तांनी रद्द केल्या आहेत. या कामाची नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याचे आदेश त्यांनी  दिले आहेत.

**<u>पेरणी</u>**

शेतकऱ्यांनी बीज प्रक्रिया करूनच सोयाबीनची पेरणी करावी असं आवाहन नारायणगाव कृषी विज्ञान केंद्राचे मृदा शास्त्रज्ञ योगेश यादव यांनी केलं. विकसित कृषी संकल्प अभियान अंतर्गत कृषी विज्ञान केंद्रातर्फे खरीप हंगामाची पूर्वतयारी हा कार्यक्रम जुन्नर इथल्या बोरी खुर्द या ठिकाणी आयोजित केला होता. त्याप्रसंगी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

**<u>बॅडमिंटन</u>**

पुण्यात नुकत्याच जिल्हा सुपर बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा पार पडल्या. यामध्ये मनीषा सहस्त्रबुद्धे यांनी तिहेरी मुकुट मिळवला. त्यांनी महिला एकेरी दुहेरी आणि चाळीस वर्षावरील गट अशा तीनही प्रकारात जेतेपद मिळवलं. पुरुष एकेरी गटात सुविर प्रधान विजेते ठरले. 35 वर्षावरील पुरुष गटात आनंद साहू तर महिला गटात नुपूर बर्वे यांनी विजेतेपद मिळवलं.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ होतं; कमाल 32 आणि किमान 23 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली. उद्याही दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहून पावसाच्या हलक्या सरी पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**